# चिंतामणी महाविद्यालय पोंभुर्णा

# जि.चंद्रपूर

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

सत्र २०१४-२०१५

रासेयो विभागाचा नियमीत आणि विशेष शिबीर अहवाल

**मार्गदर्शक**

प्राचार्य. डॉ. परमानंद बी. बावणकुळे

**विभागप्रमुख**

प्रा. विठ्ठल एस. चौधरी
प्रा. दिलीप डी. विरूटकर
प्रा. कु. शिलादेवी डी. सुर्यतळे

# चिंतामणी महाविद्यालयात स्वच्छता अभियान



चिंतामणी महाविद्यालयात दि २३ जाने. २०१५ ला रासेयो विभागाव्दारे रासेयो स्वयंसेवकाच्या माध्यमातुन स्वच्छता अभियान राबविण्यात आले. हा उपक्रम राबवित असतांना चिंतामणी महाविद्यालयातील सभोवतालचा परिसरातील कचरा काढून,परिसर स्वच्छ करण्यात आला. या उपक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी हजर होते

# महाविद्यालयात मोफत कायदेविषयक मार्गदर्शक




चिंतामणी महाविद्यालयात दि. २८/८/२०१४ ला तालूका विधी सेवा समिती व तालुका अधिवक्ता संघ. पोभुंर्णा यांच्या सयुक्त विधामाने मोफत कायदेविषयक मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.  या कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून डॉ. राजेश सिंगरू हे होते अन्याविरूध्द कायधाचा वापर कसा करावा. आणि आपल्यावर होणा–या अन्यायाचा प्रतिकार कायधाच्या माध्यमातुन कसा करावा या विषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.

# राष्ट्रीय सेवा योजना तर्फे ग्रामस्वच्छता



चिंतामणी महाविद्यालयातर्फे रासेयो विशेष शिबीर चेकआष्टा येथे दि.६/२/२०१५ ला गावातील रस्त्याची साफसफाई करतांना रासेयो स्वंयसेवक .

# चिंतामणी महाविद्यालयात वक्तृत्व करंडक स्पर्धा




चिंतामणी महाविद्यालय पोंभूर्णा येथे रासेयो विभागाव्दारे दि.१७/१०/२०१४ ला पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग ,यांच्या सयुक्त विधमाने तालूका स्तरीय स्वच्छता मिञ वक्तृत्व करंडक स्पर्धा २०१४ चे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात ब-यात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अधिकारी व महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व महाविद्यालयीन विद्यार्थी अथक परिश्रम घेतले. या कार्यक्रमास बरेच विद्यार्थी हजर होते.

# महाविद्यालयात रांगोळी स्पर्धा




चिंतामणी महाविद्यालयात रासेयो विभागाव्दारे दि. ११ फेब्रूवारी २०१५ ला रंगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाच्या माध्यमातुन रांगोळीविषयी विद्यार्थ्यांच्या कलेविषयक सुप्तगूणाचा विकास व्हावा. या उद्‌देशपूर्ती करिता या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचे मुल्यमापण करण्यासाठी प्रा. कु. ढवळे मॅडम उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांच्या कलेचे निस्वार्थपणे मुल्यमापण केले. हा उपक्रम राबवित असतांना बरेच प्राध्यापक वर्गाचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी वर्ग मोठ्या प्रमाणात हजर होता.

# चिंतामणी महाविद्यालयात हस्तकला स्पर्धा



चितांमणी महाविद्यालयात रासेयो विभागाव्दारे दि. ११ फेब्रूवारी २०१५ला हस्तकला व फूलसजावट या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.हे करत असतांना चिंतामणी महाविद्यालयातील ब–याच विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेतला.  या उपक्रमात मोठ्या प्रमाणात प्राध्यापक वर्गाचे सहकार्य लाभले.

# पोंभुर्णा तालुका ग्राम स्वच्छता अभियानात महाविद्यालयाचा सहभाग






स्थानिक पोंभूर्णा येथे दिनांक २३.०१.२०१५ रोज शुक्रवारला चिंतामणी महाविद्यालयात रासेयो विभागाव्दारे तालुका स्तरावर स्वच्छता अभियान राबविण्यात आला. यावेळी पोंभुर्णा येथील शिवाजी चौकात मा. तहसिलदार साहेब यांनी स्वच्छतेची शपथ दिली व स्वच्छते विषयी मोलाचे मार्गदर्शन केले.

राष्ट्रीय ग्राम स्वच्छता अभियानाअंतर्गत चिंतामणी महाविद्यालय पोंभुर्णा तर्फे शिवाजी चौक, पोंभुर्णा येथून ग्राम स्वच्छतेची सुरूवात मा.तहसिलदार साहेब तसेच वैद्यकीय अधिकारी यांचे मार्गदर्शनातून सुरू झाले. महाविद्यालयातील विद्यार्थी मोठया संख्येने या उपक्रमात उपस्थित होते. गावातील रस्ते बसस्थानक परिसर तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र व पशु चिकित्सालय परिसरातील कचरा आणि घान स्वच्छ केली. या उपक्रमात विद्यार्थ्यासोबत महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. बावनकुळे, प्रा. हुंगे, डॉ. नारनवरे आणि प्राध्यापकवर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहभाग घेउन ग्रामस्थांना स्वच्छेतचा संदेश दिला.

# रासेयो स्थापनादिना निमीत्य रक्तगट तपासणी व सिकलसेल तपासणी शिबीर




चिंतामणी महाविद्यालयात २४ सप्टेंबर २०१४ ला रासेयो स्थापना दिवस साजरा करण्यात आला. या दिनानिमीत्य रासेयो कार्यक्रमाचे ध्येयधोरण व व्यक्तीमत्व विकास कसा साधता येईल आणि समाजातील वाईट चालीरिती कशा समाप्त करता येतील. तसेच रासेयो विभागाद्वारे समाजात जातुन समाजपयोगी कामे कसे करता येईल या बाबतीत मार्गदर्शन झाले. त्यानंतर रासेयो विभागाद्वारे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी रक्तगट तपासणी व सिकलसेल तपासणी शिबीर घेण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्राथमीक आरोग्य केंद्र पोंभूर्णा येथील डॉक्टरांचे सहकार्य लाभले.